**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ३९ | बुधवार,दि. ०६ सप्टेंबर २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# पावसाने डोळे वटारले, शेतातील धान पिक करपू लागले



**गोंदिया:–** आठवडाभरापासून पावसाने डोळे वटारल्यामुळे एकीकडे पिकांना धोका वाढला आहे. तेथेच उकाडा असह्य होत असून, त्याचा आरोग्यावर परिणाम होत आहे. तापत्या उन्हामुळे शेतातील पाणी जिरले असून, वेळीच पाऊस न पडल्यास मात्र पिके हातून जाण्याची स्थिती आहे. मागील दहा–बारा दिवसांपूर्वी बरसलेल्या पावसामुळे धोक्यात आलेल्या पिकांना जी–वदान मिळाले, यात शंका नाही. मात्र, एकदा पावसाने दडी मारली व तीच परिस्थिती आता निर्माण होताना दिसत आहे. पाऊस बरसत नसून त्यात ऊन तापून तापमान ३४ अंशावर आले आहे. परिणामी, शेतातील पाणी जिरले असून, पिकांना पाण्याची गरज आहे. आता पाणी मिळाले नाही, तर उन्हामुळे पिके सुकणार, अशी स्थिती तयार होत आहे.

ऑगस्ट महिन्यात थोडाफार बरसल्यानंतर पावसाने परत दडी मारली आहे. परिणामी, प्रकल्पांत पाणी आले नाही व त्यांची तहान अद्याप भागलेली नाही. आता पावसाळा शेवटच्या टप्प्यात असून, ३० सप्टेंबरपर्यंत सतत दमदार पावसाची गरज आहे. कारण, असे न झाल्यास पुढील वर्षासाठी मात्र त्रास जाणार यात शंका नाही.

### मुख्य प्रकल्पांतील पाणीसाठा

| प्रकल्प | पाणीसाठा टक्केवारी |
|---|---|
| इटियाडोह | ७८.२८ |
| सिरपूर | ६७.०६ |
| कालीसरार | ६१.७८ |
| पुजारीटोला | ५९.१३ |

### ऑक्सिजनवरील लघु प्रकल्प

| प्रकल्प | टक्केवारी |
|---|---|
| गुमडोह | ३४.५३ |
| कालीमाती | २०.८४ |
| रेहाडी | ३७.९९ |
| सोनेगाव | २८.६७ |
| सालेगाव | २८.३५ |
| ओवारा | ४९.५७ |

शेतीकरिता वरदान ठरलेल्या इटियाडोह प्रकल्प यंदा पावसाच्या कमतरतेमुळे काठोकाठ भरले नाही. गतवर्षी ऑगस्ट महिन्यात सांडव्यावरून पाणी वाहू लागले होते. यावषी मात्र ८३ टक्केच पाणी साठा असल्यामुळे त्याचा रबी हंगामातील धान पिकावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात जिल्ह्यात पूरपरिस्थिती होती. सर्वदूर पावसामुळे मागील वषी कित्येकांची पिके वाहून गेली होती. यंदा मात्र त्या विपरीत परिस्थिती असून, सर्वत्र पावसाची अत्यधिक गरज आहे. पावसाअभावी पिके सुकण्याच्या स्थितीत आली असून, वेळीच पाऊस न बरसल्यास मात्र शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागणार आहे. शिवाय, पाऊस नसल्यामुळे उकाडा वाढत चालला असून, जिल्ह्याचे तापमान ३४ अंशावर होते. हा उकाडा असह्य होत असून, मधातच पावसाच्या सरी व त्यानंतर उन्हामुळे वातावरण कलुषित झाले असून, आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे. यातूनच सध्या तापाची साथ सुरू आहे. ऑगस्ट महिना संपला असून, आता मात्र दमदार पावसाने हजेरी लावली नाही, तर मात्र पिकाचे नुकसान होणार, यात शंका नाही.

### १५ प्रकल्पांत ७५ टक्क्यांवर पाणीसाठा

जिल्ह्यात ९ मध्यम तर २३ लघु प्रकल्प आहेत. यातील फक्त कटंगी मध्यम प्रकल्पात शंभर टक्के पाणीसाठा असून, डोंगरगाव, मोगरा, बेवारटोला व भुराटोला या चार लघु प्रकल्पांत शंभर टक्के पाणीसाठा आहे. याशिवाय, बोदलकसा, चुलबंद, रंगेपार या तीन मध्यम प्रकल्प व आक्टीटोला, पिपरीया, राजोली, सडेपार, जुनेवानी व उमरझरी या सहा लघु प्रकल्पांत ७५ टक्क्यांवर पाणीसाठा आहे. उर्वरित प्रकल्पांमध्ये याही पेक्षा कमी साठा असून, यावरुन जिल्ह्यात पाण्याची किती गरज आहे, हे दिसून येते.

### या प्रकल्पांची दयनीय स्थिती

जिल्ह्यातील काही लघु प्रकल्पांत फक्त नाममात्र पाणीसाठा असून, त्यांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. यामध्ये गुमडोह प्रकल्पात ३४.५३ टक्के, कालीमाती प्रकल्पात २०.८४ टक्के, रेहाडी प्रकल्पात ३७.९९ टक्के, सोनेगाव प्रकल्पात २८.६७ टक्के, सालेगाव प्रकल्पात २८.३५ टक्के तर ओवारा प्रकल्पात फक्त ४९.५७ टक्केच पाणीसाठा आहे.

# नाविन्यपुर्ण योजनेत गायींची किंमत वाढवून लाभार्थ्यांची होतेय लूट?

## बाजार पावती व विमाच्या पावतीमध्येही होतेय घोळ



### गाई, म्हशीच्या खरेदीला ७५% अनुदान दिले जात असून एका गटाची प्रकल्प किंमत खालीलप्रमाणे

**संकरित गाई / म्हशी चा गट – प्रति गाय / म्हैस रु. ४०,०००/– प्रमाणे ८०,००० रुपये**
**शुल्क ५.७५ टक्के (अधिक १०.०३ टक्के सेवाकर ) दराने ३ वर्षाचा विमा ५,०६१ रुपये**
**एकूण प्रकल्प किंमत : ८५०६१ रुपये.**

**गोंदिया:–** राज्याच्या ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी पशुपालक व शेतकरी बांधवांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देत त्यांना शाश्वत अर्थार्जनाच्या पर्याय उपलब्ध करून देणा?या पशुसंवर्धन विभागाच्यावतीने नाविन्यपुर्ण योजना राबविण्यात येत असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दोन दुधाळ गाई/म्हशी वाटप योजना नागपूर येथील पुरवठादाराच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे.ही योजना राबवितांना मात्र शेतकरी सर्वसामान्य लाभार्थ्यांची मोठी कोंडी केली जात असल्याचे चित्र गोंदिया तालुक्यातील सावरी येथील वितरण केंद्रावर बघावयास मिळाले.

त्यातच जिल्ह्याकरीता ज्या कंत्राटदार पुरवठादाराची नियुक्ती राज्यसरकारच्या पशुसंवर्धन विभागाने केली आहे,ते गोंदिया जिल्ह्याचे पुरवठादार श्री कडू यांनी आपल्या आधी मोठ्याप्रमाणात ही योजना राबवितांना गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याचा ठपका ठेवला आहे.त्या गैरव्यवहारावर आळा घालण्याकरीता आपली निवड झाल्याचे सांगत आपल्याला गैरव्यवहार चालत नसल्याचे सांगायला ते मात्र विसरले नाही. १ सप्टेंबरला अर्जुनी मोरगाव,गोरेगाव व आमगाव तालुक्यातील लाभार्थ्यांना गटवाटप करण्यात आले. यामध्ये अर्जुनी मोरगाव ३, गोरेगाव ४ व आमगाव येथील १ गटाला गायींचे दोन प्रमाणे वितरण करण्यात आले.

पुरवठादार कडू यांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांनी आज २८ संकरीत गाय लाभार्थ्यांना वितरीत करण्याकरीता आणले होते. त्यानुसार ८ गटांना १६ गायींचे वितरण झाले.तर १२ गाय (६ गट)शिल्लक राहायला हवे होते. परंतु ही प्रक्रिया संपेपर्यंत त्याठिकाणी एक गट म्हणजे २ गायीच शिल्लक राहिल्याचे दिसून आले.तर १० गायी कुठे गेल्या हा सुध्दा प्रश्न उपस्थित झालेला आहे. सोबतच लाभार्थ्यांना ८० हजार रुपयाचा गायी मिळत असले तरी बाजारभावाप्रमाणे तिथे बोली होत नसून ८०–९५ हजाराच्यावर किमत ठरवून लाभार्थ्यांकडून वरची किमंत घेतली जात असल्याचे तेढा तुमसर येथील लाभार्थी शहारे यांनी सांगितले.विम्याची रक्कमही शासन भरत असताना लाभार्थ्यांकडूनही वसुल केले जाते.त्यातच बिल्ला लावतांनाही १०००–२००० रुपयापर्यंतची लूट आणि बाजार पावतीमध्ये सुध्दा लुट केली जात असल्याचे चित्र या योजनेच्या वाटपावेळी दिसून आले.लाभार्थ्यांना गाय वाटप करतांना विभागाच्यावतीने कोर्या फार्मवर स्वाक्षरी घेतले जात असल्याचेही चित्र होते.

योजनेत पारदर्शकता यावा याकरीता पुरवठादाराची निवड–गोंदिया जिल्ह्यात पशुधनाचे वाटप होत होते,मात्र दुध उत्पादनात पाहिजे तशी वाढ होत नव्हती,त्याचा अभ्यास केल्यावर काही लाभाथी बाजारात गाय खरेदी करायचे मात्र घरी पाळत नसल्याचे समोर आल्याने हा प्रकार थांबविण्यासाठी सरकारने पुरवठादारामार्फत गाय/म्हशी वाटपाच्या नाविन्य पुर्ण योजनेकरीता पुरवठादाराची निवड केली असून दुध उत्पादनात वाढ होऊन शेतकरी सुखी व्हावा हा योजनेचा उद्देश असल्याचे पशुसंवर्धन उपायुक्त डॉ.श्रीधर बेदरकर यांचे म्हणने आहे.

# वैद्यकीय महाविद्यालयातील अमरावतीच्या प्रशिक्षणाथी डॉक्टरची गळफास घेत आत्महत्या



**गोंदिया:–** गोंदिया शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एका तरुण प्रशिक्षणाथी डॉक्टरने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज, सोमवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. यामुळे वैद्यकीय महाविद्यालयातील प्रशासनात खळबळ उडाली आहे.

भूषण विलास वाढोणकर (वय २३, वर्ष रा.अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे) असे मृत डॉक्टरचे नाव आहे. सदर तरुण डॉक्टर गेल्या काही दिवसापासून नैराश्यात होता आणि कुणाशी काहीही बोलत सुद्धा नव्हता, असे त्याच्या सोबत असणाऱ्या इतर प्रशिक्षणार्थी डॉक्टरांनी सांगितले.भूषण हा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहातील इमारत कमांक ७ मध्ये तिसऱ्या माळ्यावरील डी ३१ कमांकाच्या रूममध्ये राहत होता.सकाळी आपली ड्युटी करून सायंकाळी रुम वर आला. रुममधील सहकारी हा रात्रीची ड्युटी असल्याने आपल्या ड्युटीवर गेला.त्यानंतर सकाळी ८ वाजेपर्यंत सहकाऱ्याने त्याला मोबाईलवर कॉल केला. मात्र, कॉलचा प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे शेजारील रूमच्या बाजूला असलेल्या रुममध्ये राहणाऱ्या मित्रांना कॉल करुन सांगितले असता त्यांनी रुम मध्ये जाऊन बघितले असता. भूषणने सिलिंग पंख्याला दोराने गळफास घेतल्याचे सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास उघडकीस आले.

या घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत सूर्यवंशी यांनी घटनस्थळाला भेट दिली व वसतिगृहातील इतरांना विचारपूस केली. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविले आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार देवानंद मलगे यांनी सुरू केली आहे.

# मागण्यांची पूर्तता न झाल्यास:विमानांचे उड्डाण बंद पाडू




**गोंदिया :** शहरापासून १५ किमी अंतरावर असलेल्या बिरसी येथील १०६ कुटुंबांचे विमानतळ विस्तारीकरणासाठी इतरत्र पुनर्वसन करण्यात आले. मात्र, ज्या ठिकाणी पुनर्वसन केले त्याठिकाणी रस्ते, पाणी, वीज या पायाभूत सुविधांची वानवा आहे. त्यामुळे गावातील नागरिकांनी आता पुन्हा एकदा मोठ्या आंदोलनाची हाक दिली आहे. त्यासाठी ग्राम पंचायतीने निवेदनही दिले आहे.

बिरसी (कामठा) येथील इंग्रजकालीन विमानतळाचे नूतनीकरण करण्यात आले. विमानतळाचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. त्याकरिता बिरसी गावातील १०६ कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आले. मात्र पुनर्वसन करताना त्याठिकाणी सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या नाही. पुनर्वसित ग्रामस्थ आणि बिरसी ग्रामपंचायतीतर्फे शासन आणि विमानतळ प्रशासनाकडे अनेकदा मागण्या करण्यात आल्या. परंतु त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आले. आता मात्र ग्राम पंचायतीने आरपारचा लढा लढण्याची तयारी केली आहे. पायाभूत सुविधा तत्काळ पुरविण्यात याव्या, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि विमानतळासमोर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यासंदर्भात खासदार सुनील मेंढे, आमदार विनोद अग्रवाल, गोंदिया जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि विमानतळ प्रशासनाला निवेदनही देण्यात आले आहे.

पुनर्वसन केलेल्या ठिकाणी पायाभूत सोयी–सुविधांसाठी अनेकदा निवेदने दिली. मात्र शासन आणि विमानतळ प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात आहे. नाईलाजास्तव आता आंदोलन करावे लागणार आहे, असे सरपंच उमेशसिंग पांडेले यांनी सांगितले.

आमच्या मागण्यांची पूर्तता न झाल्यास ११ सप्टेंबरपासून आंदोलन तीव्र करूव प्रसंगी बिरसी विमानतळावरून एकही प्रशिक्षण विमान उडू देणार नाही. तसेच विमानतळाच्या प्रवेशद्वारासमोर धरणे आंदोलन, अर्धनग्न आंदोलन, उपोषण, चक्काजाम आंदोलन आणि वेळ आली तर सामूहिक आत्मदहनदेखील करण्यात येईल. हे करूनही आमच्या मागण्या पूर्ण झाली नाही तर येत्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांवर बहिष्कार घालण्याचा मानस संपूर्ण गावकऱ्यांचा आहे, असे उपसरपंच संतोष सोनवाने यांनी सांगितले.

# शिक्षकदिनी शिक्षक किरकोळ रजेवर

**गोंदिया :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या न्यायसंगत मागण्यांकडे शासन सातत्याने दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करीत शिक्षकांनी मंगळवारी (ता. ५) शिक्षकदिनी सामूहिक किरकोळ रजा आंदोलन केले. येथील जिल्हा परिषद कार्यालयासमोर एकत्र आलेल्या शेकडो शिक्षकांनी शासनाच्या धोरणाचा निषेध केला.

जुनी पेन्शन योजना लागू करणे, मुख्यालय निवासस्थानाची अट रद्द करणे, नवीन शिक्षक भरती तातडीने करणे, बदलीचे नवीन प्रस्तावित धोरण रद्द करणे, सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचे हप्ते इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना तातडीने देणे, दारिद्र्यरेषेखालील मुलींना दिला जाणारा दैनिक एक रुपया भत्ता वाढवून किमान पंचवीस रुपये करणे, विषय पदवीधर शिक्षकांना समान न्यायाची पदवीधर वेतनश्रेणी लागू करणे, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारीपदासाठी बी. एड. ची अट असावी, नगरपालिका, महानगरपालिका शिक्षकांना सातव्या वेतन आयोगासोबतच सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करावी, वसतिशाळा शिक्षकांची मूळ सेवा विचारात घ्यावी, यासह अन्य मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या बॅनरखाली शिक्षकांनी सामूहिक किरकोळ रजा आंदोलन केले. आंदोलनात जिल्हाभरातील शिक्षक–शिक्षिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# ८ दिवसात वसतीगृह सुरु न झाल्यास ओबीसी संघटना भीक मांगो आंदोलन करणार

## जिल्हाधिकारी मार्फेत मुख्यमंत्र्यांना ओबीसी संघटनाने दिले निवेदन



**गोंदिया:–** ओबीसी वसतिगृहे, आधार योजना, विदेश शिष्यवृत्ती अश्या ओबीसी विद्यार्थ्यांच्या मुद्द्यांवर विदर्भातील सर्वच जिल्हा व तालुकास्तरावर (दि.०४) मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ओबीसी बहुजन कल्याण मंत्री व सचिव यांच्या नावे असलेले निवेदन जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसिलदारांच्या माध्यमातून पाठविण्यात आले. निवेदनात ८ दिवसात ओबीसींचे वसतिगृह व आधार योजना सुरु न झाल्यास राज्यातील ओबीसी संघटना येत्या १२ फेब्रुवारीला भीक मांगो आंदोलनाच्या माध्यमातून गोळा झालेला निधि वित्त विभागाला पाठविणार असल्याचा इशारा या निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे.

नागपूर येथे ओबीसी युवा अधिकार मंचच्यावतीने नागपूरचे जिल्हाधिकारी, सहाय्यक आयुक्त सामजिक न्याय आणि महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन आणि सूचना पत्र पाठवण्यात आले.

गोंदिया येथे जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांच्या मार्फेत ओबीसी अधिकार मंच व ओबीसी संघर्ष कृती समिती, गोरेगाव येथे तहसिलदार यांच्या मार्फेत ओबीसी सेवा संघाने निवेदन सादर केले. चंद्रपूर जिल्ह्यात चंद्रपूर येथे जिल्हाधिकारी यांच्या मार्फेत ओबीसी सेवा संघ व ओबीसी जनगणना समन्वय समितीने निवेदन दिले. तसेच कोरपणा, बल्लारपूर, राजुरा, गोंडपंपरी, वरोरा, वडसा, आरमोरी येथेही निवेदन सादर करण्यात आले. वणी, यवतमाळ,भंडारा येथेही निवेदन देण्यात आले. उमरेड येथे महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्यावतीने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.



निवेदनात ओबीसी, व्हिजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांसाठी एकही वसतिगृह सुरू झालेला नाही. कारण वित्त विभागाकडून निधी वितरीत केला गेला नाही. आधार योजनेला अजूनही वित्त विभागाची मान्यता मिळाली नाही. परदेशी शिष्यवृत्ती योजनेत संख्या वाढविण्यासाठी सुद्धा वित्त विभागाची मान्यता मिळाली नाही.

अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या योजना पहिल्यांदा ओबीसी विद्यार्थ्यांना वसतिगृहे मिळणार आहेत तरी सुद्धा वित्त विभाग या अन्यदाता, कष्टकरी समाजाच्या आड येत आहे यावरुन शासनाची नियत समजून येत आहे.वित्त मंत्रालयाकडून सातत्याने ओबीसी विद्यार्थ्यांच्या योजनेत खोडा घातला जात आहे. ओबीसी, व्हिजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या योजनेच्या फाईल अडवल्या जात आहे आणि त्यात नकारात्मक शेरा दिला जात आहे. यावरुन असे कळते की महाराष्ट्र शासनाचा वित्त विभाग ओबीसी विरोधी आहे.

यास अनुसरुन महाराष्ट्रातील विविध ओबीसी संघटनांनी असे ठरविले आहे की जर येत्या ११ सप्टेंबर २०२३ रोज सोमवार पर्यंत आमच्या मागण्या मान्य न झाल्यास शासनाकडे ओबीसी, व्हिजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांसाठी निधीची कमी आहे असे समजून १२ सप्टेंबर २०२३ मंगळवार रोजी भीक मांगो सत्याग्रहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यातून भीक मागून शासनास मनीऑर्डर द्वारे शासनास निधी पाठण्यासाठी आंदोलन करण्यात येईल असे म्हटले आहे.

निवेदन देतेवेळी ओबीसी अधिकार मंचचे अशोक लंजे, कैलास भेलावे, सविता बेदरकर, अतुल सतदेवे, सुनिल भोगांडे, शिशिर कटरे, चंद्रभान तरोणे, संतोष भेलावे, स्वानंद पारधी, जि.प.सदस्य पवन पटले, मिलिंद समरीत, हरीष मोटघरे, रवी सपाटे, सावन डोये, निखिल गजभिये, लिलाजी डहारे, प्रेमलाल गायधने, मुकेश भांडारकर, टेकराम बिसेन, प्रेमलाल साठवणे आदी ओबीसी कार्यकर्ते उपस्थित होते.



नागपूरात निवेदन देतेवेळी ओबीसी युवा अधिकार मंचचे सयोंजक उमेश कोर्राम, कृतल आकारे, पंकज सावरबांधे, पियूष आकरे, आकाश वैद्य, प्रतीक बावनकर, विशाल पटले, नयन कालबांधे आदी उपस्थित होते.

गोरेगाव येथे ओबीसी सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष सावन कटरे, आर.आर.अगडे, प्रेमलाल डोनेकर, भुमेश ठाकरे, खोमेश्वर रहांगडाले, सुरेश पालेवार, टेकेश रहांगडाले, अजय कोठेवार, शैलेंद्र देशमुख, रवी चौव्हान व डॉ.पारधी आदी उपस्थित होते.

आमगाव येथे तहसिलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी ओबीसी सेवा संघाचे डॉ.गुरुदास येडेवार, डॉ.सुरेश गराडे, सुरेन्द्र मेंढे, प्रद्युम्न महारवाडे, चव्हण सर, वाघमारे, मेश्राम, मुकेश उजवणे आदी ओबीसी पदाधिकारी उपस्थित होते.

भंडारा येथे निवेदन देताना संघाचे गोपाल सेलोकर, ईश्वर निकुडे, रमेश शहारे, जयंत झोडे, संजीव बोरकर, रोशन उरकुडे, गोपाल देशमुख, तुळशीराम बोंद्रे, मनोहर टिचकुले, श्रीकृष्ण पडोळे, भाऊराव सार्वे, अरुण जगनाडे आदि पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



उमरेड येथे प्रातीक तेलीक समाजाच्यावतीने एसडीओंना निवेदन देताना




चंद्रपूर येथे ओबीसी सेवा संघाच्यावतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देतना



गोरेगाव येथे ओबीसी सेवा संघाच्यावतीने तहसीलदारांना निवेदन देताना



भंडारा येथे ओबीसी सेवा संघाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना

## संपादकीय

# दुष्काळाचे सावट सरकारची डोळेझाक

ऑगस्ट महिना संपला. या महिन्यात महाराष्ट्रात काही ठरावीक दिवस आणि ठरावीक भाग वगळता पाऊसच पडला नाही. संपूर्ण ऑगस्ट महिना कोरडा गेला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. यामुळे जुलै महिन्यात ज्या पावसाने तारले होते, त्याच पावसामुळे ऑगस्ट महिन्यात शेतकऱ्यांना मरणयातना सहन कराव्या लागल्या, अशी भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. खरं तर गेल्या महिन्यात म्हणजे जुलै महिन्यात चांगला पाऊस बरसला म्हणून अनेक शेतकऱ्यांनी पिकांना वरखते दिली. पेरणी वेळी दिलेल्या खतांमुळे आणि वरखतांमुळे पिकांची जलद गतीने आणि लवकरात लवकर वाढ होईल अशी भोळीभाबडी आशा शेतकऱ्यांना वाटत होती. पण आता शेतकरी आभाळाकडे डोळे वर करुन बसला आहे.

गेल्या महिन्यात काही भागांत ढगाळ हवामान असल्यामुळे पिकांवर किडीचा प्रादुर्भाव झाल्याने महागड्या फवारण्या देखील केल्या होत्या. मात्र ऑगस्ट महिन्यात पावसाचा मोठा खंड पडला असल्याने महागड्या औषधांचा आणि खतांचा खर्च वाया जाण्याची भीती आता व्यक्त होऊ लागली आहे. सध्या पिकांनी माना टेकल्या आहेत. अनेक भागांतील पिके करपून गेली आहेत.पुर्व विदर्भातील धानउत्पादक शेतकरी तर मेटाकुटीस आलेला आहे. शेतातील धानपिक पिवळे पडू लागले त्यातच जमिनीला भेगा पडू लागलेल्या आहेत.तरीही सरकारी यंत्रणा काय करतं अशा प्रश्न निर्माण झालेला आहे.

पुढील काही दिवसांत पाऊस झाला नाही तर पेरणीसाठी केलेला हजारो रुपयांचा खर्च तसेच औषधांचा आणि खतांचा खर्च वाया जाण्याची भीती शेतक?याला आता सतावू लागली आहे, तर काही भागांतील आ–ताच पिके हाताबाहेर गेली आहेत. तर काही ठिकाणी पिकांची राखरांगोळी झाली आहे. ज्या भागात पाऊस नाही तिथे दुष्काळासारखी परिस्थिती पाहायला मिळत आहे. अजूनही राज्यातील धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा तयार झालेला नाही. विहिरींत पाणी उतरलेले नाही, अनेक भागांतील विहिरींनी पावसाळ्यात तळ गाठला आहे. अशा परिस्थितीत येत्या काही दिवसांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील ऐरणीवर येण्याची शक्यता नाकारत येत नाही.

जनावरांच्या चाऱ्यासाठी आणि पाण्यासाठी देखील शेतकऱ्यांना वण–वण भटकावे लागणार आहे, हे कदाचित पुढील काळातील विद–ारक चित्र असू शकते. त्यामुळे, आता बाकी राहिलेल्या मान्सूनच्या दीड महिन्यांच्या काळात तरी चांगला पाऊस पडावा, अशी शेतकऱ्यांची इच्छा आहे. अशातच पुढील तीन–चार दिवसांत राज्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.या संबंधित भागात ०.५ ते १.५ मिमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच, कोकण विभागातील सिधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर या जिल्ह्यांत देखील हलका पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच मराठवाडा विभागातील धाराशिव, हिंगोली, बीड, संभाजी नगर, जालना, परभणी आणि नांदेड या जिल्ह्यांमध्येही हलका पाऊस पडणार असा अंदाज नुकताच वर्तवला आहे. या अंदाजानुसार राज्यात नजीकच्या काळात कुठेच मुसळधार पाऊस पडणार नाही असे यावरुन स्पष्ट होत आहे.

पाणीटंचाई, दुष्काळ हे चित्र महाराष्ट्रासाठी नवे नाही.राज्याला १९७२च्या दुष्काळाने होरपळून टाकले. त्यानंतर तब्बल ४० वर्षे मोठा, जवळपास संपूर्ण राज्याला कवेत घेणारा दुष्काळ पडला नव्हता. ढोबळमनाने मराठवाड्यातील आठ जिल्हे, नगर, सोलापूर, पश्चिम विदर्भासह सातारा, सांगली, पुणे जिल्ह्यांचा काही भाग दुष्काळी पट्ट्यात, अर्थात पर्जन्यछायेत येतो. १९७२ नंतर राज्यातील या पट्ट्यातील काही भागांत पाणीटंचाईची स्थिती निर्माण होत असे, मात्र या संपूर्ण पट्ट्याला एकाचवेळी अवर्षणाची स्थिती निर्माण होत नसे. त्यामुळे मोठ्या दुष्काळाशी दोन हात करण्याची वेळ महाराष्ट्रावर १९७२ नंतर आली नव्हती. त्यानंतर २०१२ मध्ये, सन २०१५ आणि सन २०१८ मध्ये महाराष्ट्राकडे पावसाने पाठ फिरविली.

राज्यातील बहुताश भागांत सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला. १९७२ मध्ये पावसातील तूट ३२ टक्क्यांपासून ५७ टक्क्यांपर्यंत होती. २०१२ मध्ये राज्यात वार्षिक सरासरीच्या ८९ टक्के पाऊस पडला. मात्र विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्राचा काही भाग आदी ठिकाणी पावसाचे प्रमाण कमी होते. हा दुष्काळ महाराष्ट्राबरोबर मध्य प्रदेश, गुजरात, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांनीही अनुभवला. त्यानंतर २०१५ मध्येही पावसाने पाठ फिरविली. राज्यातील २३ जिल्ह्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला आणि मोठ्या दुष्काळाचा सामना करावा लागता होता.

दुष्काळग्रस्त स्थितीचा अंदाज राज्य सरकारला आल्यानंतर महाराष्ट्रातील कोणत्याही भागातील शेतकरी अडचणीत असेल तर त्याला तत्काळ मदत व्हावी यासाठी वॉर रुम निर्माण करत आहेत; परंतु त्याचबरोबर जनतेला कशी मदत मिळेल याचा विचार करायला हवा. संकटाच्या परिस्थितीत लोकांना जगवले पाहिजे. त्यांना कामे दिली पाहिजेत. पशुधन वाचवले पाहिजे. पशुधनासाठी चारा दिला पाहिजे. शेतकऱ्यांना गाई, म्हशी पुरवल्या पाहिजेत. त्यानंतर पिण्याचे पाणी पुरवले पाहिजे. शेतकरी आणि कष्टकऱ्यांकडून जी वित्तीय संस्थांकडून वसुली केली जाते, त्याला माफी दिली पाहिजे. कर्जातून सूट दिली पाहिजे. कर्जाचे दीर्घ हप्ते केले पाहिजेत. हे सर्व करायला हवे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयात वॉर रुम उभारण्याची घोषणा मुख्यमंर्त्यांनी केली,मात्र त्या वॉर रुममधून खरंच दुष्काळीभागातील वास्तव चित्रण सरकारी यंत्रणा मांडत आहे का हा सुध्दा महत्वाच प्रश्न समोर आलेला आहे.

# लोकतंत्र बचाव संविधान बचाव




**गोंदिया:** देशात संविधानाला विघातक असे कृत्य आणि घटना–घडामोडी घडत आहेत. या सर्व प्रकाराला केंद्र सरकार खातप–ाणी घालून लोकतंत्र धोक्यात आणूण संविधानावर आघात करीत आहे. यामुळे लोकतंत्र बचाव–सविधा बचाव या संकल्पनेतून सर्व सामाजिक संघटनाकडून संकल्प रैली काढून सरकारविरुद्ध जनआक्रोश व्यक्त केला. तसेच आंदोलनाच्या माध्यमातूण केंद्र सरकारचा निषेध नोंदविण्यात आला. देशात घडणाऱ्या समाज बिघडक घडामोडीवर आळा घालण्यासाठी पाऊल उचलण्यात यावे अशा मागणीचे निवेदनही शिष्टमंडळाच्या वतीने राष्ट्रपती यांना पाठविण्यात आले.

मणिपूर राज्यात आदिवासी बांधव व महिलांवर अत्याचाराच्या घटना घडत आहेत. त्याचबरोबर आदिवासी, मुस्लीम, दलित, ओबीसींसह बहुजनांवर अन्याय, अत्याचर केला जात आहे. या घटनावर आळा घालण्यासाठी शासनाकडून ठोस पाऊस उलचण्यात यावे मंडल आयोग, नधीप्पन आयोग, स्वामीनाथन आयोगाची सिफारीशी लागू करण्यात यावी, ओबीसी जनगणना करण्यात यावी, क्रिमिलेयरची अट रद्द करण्यात यावी, महाज्योती–बार्टीला पुरेसा निधी उपलब्ध करुन द्यावा, सरकारी विभागाचे खाजगीकरण थांबवावे, आमदार–खासदार यांची पेंशन बंद करावी. जुनी पेंशन लागू करावी, विदर्भ राज्याची निर्मिती करण्यात यावी, आदि मागण्याला घेवून सर्व सामाजिक संघटना व मैत्री संघाच नेतृत्वात (दि.२६) गोंदिया येथे संकल्प रैली व जनआक्रोश आंदोलन करण्यात आले.

दरम्यान संविधान बचाव–देश बचाव अशी नारेबाजी करीत केंद्र सरकारविरुद्ध आक्रोश व्यक्त करण्यात आला. तसेच उपरोक्त मागण्याचे निवेदन उपविभागीय अधिकारी मार्फ़त राष्ट्रतींना पाठविण्यात आले. या आंदोलनात हजारोंच्या संख्येत युवक–युवतीसह महिला पुरुष सहभागी झाले होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# अजातचे प्रणेते गणपती उर्फ हरी महाराज (मंगरूळ दस्तगीर)




**सतीश जामोदकर**
**हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८**

जोतीराव फुले सत्यशोधक होवून गेले चळवळी एक तेच तत्व सकपीक महाराजांचे होते. (अ.२७,पु.२८९ श्री गुरुकृपा सिंधु ग्रंथ रचयिता, नामदेव बालाजी बाळणे, अचलपूर) असा उल्लेख आहे. याच अध्यायात नामदेव काळणे यांनी मंगरूळचा काला याचे सविस्तर वर्णन केले आहे. गणपती महाराजांनी सर्व जाती धर्माच्या लोकांना एकत्र करुन भाकरीचा काळा करणार असे जाहीर केले. कोणाची तक्रार असल्यास बोलावे असेही आवाहन केले. श्रीकृष्णाने जसा गोकुळाचा शिदोऱ्यांचा काला केला. तसाच मी गणपती महाराज त्याच भावाने पंडीत आणि ज्ञानी यास बोला–वून विरोध करणाऱ्यांनी सुद्धा यवे असे म्हटले होते. असे आवाहन केल्यावर महाराजसमोर कोणाचीही येण्याची हिंमत होईना, पंडीत, ज्ञानी ब्राम्हणांचे काहीच चालेना सर्वजण मागे कुरकूर करीत, धर्म भ्रष्ट केला, गणपत बुवा, नी घडला असे म्हणत. त्याचवेळी काल्यात विघ्न आणून काल्याच्यावेळी गणपती महाराजांना मारण्याचा दुष्ट हेतू ठेवून लाठ्या–काठ्या जमविला. परंतु हा कट महाराजांना समजला. त्यांनी रिपोर्ट दिला. या काळी हरीच्या जलसाचे मालक सत्यशोधक गुलाबराव पाटील नायगावकर यांनी महाराजांना आम्ही काल्याचे वेळी स्वत: जा–तीने हजर राहू म्हणून सांगितले. महाराजांना ते म्हणाले, तुम्ही ब्राम्हणांचे भय मानू नका. तुम्हाला धक्काही लागू देणार नाही. दुसऱ्या दिवशी पूर्ण बंदोबस्त करुन साळी बाराला काळा झाला. महाराजांनी शिदोऱ्या बोलवून हरीचा काळा गोड करुन घेतला. परंतु या साध्या वाटणाऱ्या काल्याला तत्कालीन परिस्थितीत जातीभेद भोवला. वाटविले रुढी मार्ग झुगारला. म्हणून लोकांना ब्राम्हणांनी फितविले. त्यामुळे जवळचे लोकही दुर गेले. परंतु महात्मा जोतीराव फुलेप्रमाणे आपल्या दृढ निश्चयामागे सत्यकार्य करण्यासाठी सत्यासाठी सत्य प्रतिपादन करण्यासाठी त्यांनी आपले काम सुरु झाले. गणपती महाराजांचा नाश झाला पाहिजे असेही त्यांना वाटत असे. परंतु महाराजांनी यास न जुमानता हे कार्य चालू ठेवले. अशी अनेक उदाहरणे या ग्रंथामध्ये आढळतात. भाकरीचा काला करुन जातीभेद मिटविण्याची ही अनोखी पद्धत म्हणावी लाागेल.

**वातोंडयाचा काला**

असाच एक दुसरा वातोंडयाचा काला होय. गणपती महाराज येवल्याला आले तेथून खैरीला व तेथून वातोंडा येथे. या वातोंडयाचा हिंमतपूर वातोंडा म्हणून ओळखले जाते. पूर्णानगर (भुगाव) ते वातोडा शुक्लेश्वरच्या रस्त्याने पूर्णानगरपासून पाच किलोमीटर अंतरावर असलेले चिमुकले गाव, सावळापूर (पुर्णा) व हिंमतपूर वातोंडा यांच्यामध्ये पूर्णा नदी वाहते. या गावात महाराज वैशाख पोर्णिमेला (१९२४ साली) चार गावच्या शिदोऱ्या बोलावून पूर्णा नदीच्या काठी भाकरीचा काला करण्यात आला. जवळजवळ चारशे लोकांनी महाप्रसाद घेतला. मोतीराम मानकर यांचे घरी महार–ाज आले. त्याचा भाऊ बारकाजी व तुकाराम हे महाराजांचे भक्त झाले. येथे भजन मंडळ तयार झाले. रावजी गवळी वातोंडयात विख्यात होते. (माझ्या वडीलांचे पणजोबा, आईचे वडील) त्यांचा महाराजांवर लोभ होता. महाराजांचे काम सांगितल्याप्रमाणे करीत. त्यांचे वचन खाली पडू देत नव्हते. महाराजांचे वातोंडयावर प्रेत होते. तेथे भक्तीनेम वाढविला. रावजी गवळींचे मुले शामराव (माझ्या वडीलांचे आजोबा), मारोती, नामदेव व हरीभाऊ हे सुद्धा पुढे भक्त झाले. शामराव यांचे मुले सोमनदेव, ॲडव्होकेट सोपानदेव गवळी) व बाबाजी ॲड. गोपाळराव शा.गवळी हे सुद्धा महाराजांचे भक्त होते. येथील वाळवंटासारख्या प्रदेशात, अंबराईत महाराजांचे किर्तन झाले होते. जवळपास एक महिना या गावी राहिले. वातोंडयात आल्यापासून आम्ही सुधारलो, सुखी झालो असे म्हणत असत. रावजी गवळींचे सर्व घरच झेंडीधारी बनले होते. (माझी पणजी वडीलांची आजी) पांढरे कपडे परीधार करीत हाेी असे माझी आई सुशीलाबाई जामोदकर सांगत असते. पखवाज वाजविण्याचे काम नामदेव गवळी करीत असत. सावळापुरचे गो–विंदराव पाटील हे सुद्धा महाराजांचे भक्त बनले होते. पुढे याच हिंमतपूर वातोंडा गावात महाराजांचे जेष्ठ चिरंजीव ज्ञानेश्वर महाराज आले आणि दीनस्थान वासी झाले. त्यांनी त्या ठिकाणी स्वतंत्र श्वेत सतीत्व निशाण उभारले. आजही चाळीकाठी बरीच मंडळी वास्तव्य करुन आहेत. विविध कार्यक्रम येथे आयोजित केले जातात. याच ठिकाणी ज्ञानेश्वर महाराजांनी पुष्कळ साहित्यनिर्मित केली असून स्वानुभाव कहाणी लिहिली आहे. मृत्यूसमयीच्या काही वर्षापुर्वी माझ्या वडीलांचे मामा ॲड.सोपानदेव गवळी हे त्यांचे जेष्ठ चिरंजीव डॉ. दिनेश गवळी यांच्याशी मंगरूळदस्तगीर येथील मंदिरात देणगी संबंधात माझ्या समक्ष बोलत होते. त्यांच्याच घरी मला केजाजी महाराज, गणपती महाराज व ज्ञानेश्वर उर्फ दादाजी यांचे छायाचित्रे मिळाली व गणपती महाराज यांची पणजी आणि दाद–ाजी उर्फ ज्ञानेश्वर महाराज यांची जात गवळी यांच्या पणतुला दिली आहे. आजही गणपती महाराज व रावजी गवळी यांच्यापासून स्नेह बंध नाते बंद पुरत आहेत.

१८२० साली कार्तिक शुद्ध दशमीला रसुलाबाद ता.पुलगाव जि.वर्धा, (माझ्या मोठ्या मामी उषाबाई मनोहरराव यावलकर यांचे माहेर) गावी वरीलप्रमाणेच काला करण्यात आला. तेव्हा सज्ञनाला आनंद झाल्याचे गणपती महाराज म्हणताात. परंतु दुर्लक्ष संतापून वाटेल ते बोलतात. काल्याने तर तंत्री याच गावी व्याख्यान झाले. तेव्हा सर्वांच्या शंका मिटल्या व सर्वजन स्वत:चा मौन धरुन बसले होते.

दि.२५/०७/१९२३ ला वर्धा जिल्ह्यातील निमगावात मेराराम पृथ्वीराज कनोजे ब्राम्हण यांचे हस्ते भाकरीचा काला करण्यात आला. निमगावचे पाटील दिवंगत माधवराव सबाने हे गणपती महाराजांचे शिष्य होते. त्यांनीच कार्यक्रमाचे आयोजन केले होते. गावागावावरून शिदोऱ्या बोलावून एकत्रीत केल्यावर तो काला आनंदाने कनोजे महाराज (ब्राम्हण) यांनी सेवन केला. मग हजारो लोकांनी आनंदाने स्विकारला. (समाजसुधारक गणपती महाराज, डॉ. बाळ पद–वाड, प्रथम आवृत्ती १९५७, पृ.९६)

**लोकरुठीचा**

लोकजागृतीसाठी गणपती महाराजांनी अचूक वापर केला असल्याचे वरील लोक काल्यावरुन दिसून येते. गरीब घरांची भाकरी शिदोरी विविध जाती धर्मातील लोकांनी एकत्र येवून जातीभेद मिटविण्यासाठीची ही कलुपती अत्यंत यशस्वी झाल्याचे दिसते.

**गंधर्व विवाह:** स्त्रिया विधवा झाल्यावर त्यांना सती जावे लागत असे त्याचप्रमाणे सती न गेल्यास त्यांना बोडखे केल्या जात असे. ही दुष्ट चाल विशेषत: ब्राम्हण वर्गात मोठ्या प्रमाणात होती. ती काही ब्राम्हणांनी मोडून गंवर्ध विवाह केल्याबद्दल त्यांनी ब्राम्हणांचाही गौरव केला आहे. दहीगाव पूर्णा (माझ्या गावाजवळ असणारे, आमच्या गावाला दहीगाव–राजना पुर्णा म्हणून पुर्वी ओळखले जायचे) निलकंठ जोशी ब्राम्हण, पुर्वीच्या अचलपूर तालुक्यात यांनी गंधर्व पद्धत अवलंबवावी असे म्हटले होते. त्यासाठी त्यांनी पत्रके छापली होती. ते खरा बोलला म्हणून इतर ब्राम्हण त्यास काळा समान मानत असत. अमरावतीत रामचंद्र वासुदेव भट यांनी पाट लावला होता मिठा विवाहाचे बील दिल्ली सरकारने पारीत केले होते. त्याचेही महाराजांनी स्वागत केले होते. डॉ. गोरे यांनी त्यासाठी प्रयत्न केले. महाराजांचे दुसरे लग्न पटकी जातीच्या मुलीबरोबर केला तर जेष्ठ मुलगा ज्ञानेश्वर यांचा विवाह कुणबी समाजाच्या मुलीबरोबर केला. लोण सावळीच्या विठाबाई घुरट या कुणबी जातीच्या मुलीचे गणपती महाराज यांच्या जेष्ठ चिरंजीव ज्ञानेश्वर महाराज यांच्याशी मित्र विवाह लावल्या जेव्हा या लग्नाचा विठाबाईच्या नातेवाईकांनी विरोध केला. म्हणून हे लग्न वर्धा येथे ब्राम्हणोत्तर चळवळीचे नेते नायडू वकील यांच्या घरी लावल्या गेले. या लग्णाला वकील, बॅरीस्टर, चीफ पोलीस हजर होते. हे लग्न नाही म्हणून विठाबाईच्या मुलीचे नाव सुलोचना होते. (स्वानुभाव कहाणी, दादाजी उर्फ ज्ञानेश्वर महाराज, हस्तलिखीत)

**सत्यशोधक–ब्राम्हणेत्तर चळवळ आणि गणपती महाराज**

आज शंभर वर्षापुर्वी म्हणजे सत्यशोधक समाजाच्या सुवर्ण महोत्सवात महाराजांचे कार्य खुपच जोमात होते असे दिसते. १९२३–२४ साली त्यांनी काला या लोकरुठी प्रकाराचा प्रबोधनासाी वापर केला. तसेच अस्पृश्यता निवारणासाठी ही कार्य केले. १९२७ ला अखिल भारतीय ब्राम्हणेत्तर काँग्रेसचे अधिवेशन झाले. त्या अधिवेशनात अस्पृश्यता निवारण समितीच्या अध्यक्षस्थानी गणपती महाराजांची अविरोध निवड व्हावी म्हणून कोल्हापूर संस्थानाचे राजे श्री. राजारामजी महाराज यांनी गणपती महाराज यांची निवड केली. त्यांची अध्यक्षपदी निवड झाल्यावर पुष्पहाराने गणपती महाराजांचे स्वागत राजारामजी महाराज यांनी केले. शाहू छत्रपतीचा वारसदार म्हणून त्यांनी गणपती महाराजाचा गौरव केला. सत्यशोधकांचा या अधिवेशनात मोठा सहभाग होता.

महाराजांनी सत्यशोधकांच्या मदतीने वऱ्हाड मध्यप्रांत, बहिष्कृत जादा परिषद मंगरूळदस्तगीर ता.चांदूर (रेल्वे) आजचा धामणगाव रेल्वे येथे विठ्ठल मंदिर असपृश्यांना खुले केले तर शेकडो स्पृश्य–अस्पृश्य लोकांचे एकत्र सहभोजन केले. १९/११/१९२९ रोजी सोमवारी ही परिषद झाली. यासाठी कलकाल्याचे अस्पृश्यांचे पुढारी श्री.विराटचंद्र मंडल बी.ए.यांच्या नेतृत्वाखाली झाले.

महाराजांचे शिष्य मोर्शीचे नानासाहेब उर्फ नारायणराव गणपतराव अमृतकर वकील हे सत्यशोधक ब्राम्हणेत्तर चळवळ–ीचे मोठे कर्तबगार नेते होते. तेच अमरावती येथील परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. १९२९ साली सत्यशोधक चळवळीचे आनंदस्वामी महाराजांना भेटावयास गेले होते. त्याचप्रमाणे सत्यशोधक गुलाबराव पाटील शिसोदे यांचे नायगाव दोन किलोमीटरवर होते. नायगावरांचा एकवाडा मंगरूळदस्तगीर येथे आहे. त्यांची एक शाळाही मंगरुळदस्तगीर येथे आहे. गुलाबराव पाटील गणपती महाराजांच्या कार्याला सतत मदत करीत असत. मंगरूळदस्तगीर येथे गणपतराव लाहबर सुद्धा सत्यशोधक ब्राम्हणेत्तर चळवळीत काम करीत मंगरूळदस्तगीर येथे ४/११/१९२७ ला चांदूर तालुका ब्राम्हणेत्तर परिषद भरली होती.

गणपती महाराज उर्फ हरी महाराज यांचा जन्म १८८७ साली काचतुर जि.वर्धा या गावी विठोबाजी भबुतकार व जनाबाई यांच्या पोटी झाला. लहाणपणीच त्यांचे पितृछत्र हरविले. त्यांच्या आईने कष्टाने त्यांना वाढविले. रसुलाबाद येथे त्यांचे काही काळ वास्तव्य होते. तेथेच त्यांची बंडखोरवृत्ती दिसून आली. पुढे ते केजाजी महाराज यांच्या सानीध्यात आले. किर्तनाची त्यांना गोडी ला–गली. भोसले महाराज नागपूर यांनी त्यांचा अंगरखा देऊन सत्कार केला. हा शेला गणपती महाराज यांच्य वंशजाकडे अजूनही आहे. पुढे मंगरूळदस्तगीर येथे येऊन त्यांनी तीच कर्मभुमी केली. असे असले तरी त्यांनी कावली (वसाड), मदनी अशा गावांनाही भटकंती करावी लागली.

आपल्या आयुष्यात खऱ्या अर्थाने महात्मा जोतीराव फुले यांचे कार्यकृतीने केले. अस्पृश्यता निवारण, स्नेहभोजन, मंदिरप्र–वेश, आंतरजातीय विवाह अशा चळवळी राखून श्वेतनिशाणधारी (झेंडेधारी) मंडळी गाव स्वच्छता करुन भजन करुन आजही ही चळवळ पुढे नेत आहे. विशेष उल्–लेखणीय बाब म्हणजे त्यांनी अजात या श्वेतनिशाधारी मानव संस्थेची स्थापना केली. स्वत:च्या मुलांच्या शळेच्या दाखल्यावर जात न लिहीता अजात नोंदविले. त्यासाठी त्यांच्या आजच्या वारसांना त्रासही सोसावा लागले. त्यांचे चिरंजीव सोपान महाराज यांनी संस्था पुढे नेली. त्यांना निमकर कुटुंबियांनी सहकार्य केले. आज गणेश भबुतकार व सुनयना अजात त्यांचे कार्य पुढे नेत आहे.

महाराजांच्या कार्यावर एक डॉक्युमेंट्री सुद्धा बनविण्यात आली. ॲड. प्रकाश आंबेडकरांनी काही वर्षापुर्वी दाखल्यावरील जातीची नोंद नोंदविणे बंद करावे अशी मागणी केली होती. परंतु महाराजांनी ती पुर्वीच अंमलात आणली होती. सत्यशोधक ब्राम्हणेत्तर चळवळीच्या व त्यांच्या श्वेतनिशानधारी मंडळीच्या सहाय्याने महाराजांनी अभुतपूर्व कार्य केले असल्याचे दिसते. त्यांच्या कार्याला प्रेरणामानून आजचे पिढीने तसे करणे आवश्यक आहे. असे सत्यशोधक समाजाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवा वर्षानिमित्त वाटते.

# गौरव आणि कृतज्ञत ही :सत्यपालची सत्यवाणी



सत्यपाल महाराज सप्त खंजिरीवाले महाराष्ट्रात माहित नाही असे गाव–खेडे सापडणार नाही. तुकडोजी महाराजांची खंजिरी सत्यपाल महाराजांनी महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही कीर्तनाच्या माध्यमातून जनामनात पोहोचवली. एकाच वेळी सात खंजऱ्या वाजविणारे तरुण सत्यपाल महाराज या कराम तीने महाराष्ट्रात प्रसिद्धीस पावले. काल एका प्रसिद्ध मराठी दूरचित्र वाहिनीने सत्यपाल महाराजांचा सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव तर केलाच समाजाच्या वतीने एकप्रकारे कृतज्ञताही व्यक्त झाली. संत तुकाराम महाराज, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज हरेकाची कीर्तनाची एकमेवाव्दितीय शैली. तशीच सत्यपाल महाराज यांची सुद्धा अनोखी अशी कीर्तन शैली, दोन्ही हातात तीन–तीन अशा सहा, दोन पायांच्या गुडघ्यावर एकेक म्हणजे दोन, एकाचवेळी अशा सात–आठ खंजऱ्या वाजवणे, कीर्तनात यथोचित तुकडोजी महाराजांची भजने गाऊन, ग्रामगीता, लहर की बरखा मधील ओव्यांचे दाखले देत, कीर्तनाचा आशय सकस करणे, अगदी अफ लातून, अचाट गुणवत्ता. लोकांना भावणारी शैली.

समोर बसलेल्या लहान मुलांमधून एखाद्या मुलाला मंचावर बोलवून त्याचे सामान्य ज्ञान, शिक्षण, शाळा, वर्ग विचारुन त्याला एखादे पुस्तक, मासिक भेट देतात; तर एखाद्या मायमाऊलीला बोलावून साडी पुस्तक भेट देतात; एखाद्या पुरुषाला शेती मालाचे भाव विचारत संवाद साधून शिक्षक वर्गाध्यापनात जसा पोरांचा प्रत्यक्ष सहभाग घेऊन शिकवण्यात जिवंतपणा आण–तात, तसेच सत्यपाल महाराजांचे कीर्तन. खंजिरी सोबतच सत्यपाल महाराजांनी कीर्तनातून कबीर, तुकाराम, नामदेव, गोरोबा, तुकोबा, संताजी, सावता, सेनान्हावी, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज इत्यादी संतांना एका सूत्रात गुंफले. सुफी, वारकरी संत परंपरेचा विचार सप्त खंजिरीच्या मधूर बोलामधून माणसामाणसांत निनादू लागला. संतांच्या जोडीला लोकायत, जैन, बुद्ध, लिंगायत, महानुभाव पंथीय महामानवांचे समाजोन्नतीचे कार्य सांगत, फुले शाहू आंबेडकरी विचारांची विवेकी पेरणी सत्यपाल महाराजांच्या कीर्तनातून होत असल्याने कीर्तनाचा विषय आधुनिक राष्ट्रीय कीर्तन असा अलगदपणे होऊन जातो.

सत्यपाल महाराज हे वऱ्हाडातील अकोट तालुक्यातील वास्तव्य असलेले. या परिसराला सामाजिक सांस्कृतिक संघर्षाची अफाट परंपरा लाभलेली आहे. अकोटला खेटून असलेल्या खामगाव बुलढाणा परिसरात एकेकाळी शेतकरी आंदोलन शिखरावर पोहचले होते. सत्यशोधक आनंदस्वामी या ब्राम्हणेतर नेत्यानी सावकरशाही विरुद्ध दंड थोपटून या परिसरातील बेदरकार सावकारशाहीला सळो की पळो करून सोडले, आनंदस्वामी आणि त्यांचे सहकारी लाल रंगाचा वेष धारण करून, एक प्रकारे शेतकऱ्यांसाठी क्रांतिकारक कार्य असल्याच्या विश्वासाने

शेतकऱ्यांच्या शोषणाविरुद्ध अहोरात्र झटत. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी लढणारे लाल डगलेवाले बाबा म्हणून आनंदस्वामी आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा दरारा होता. सत्यशोधक चळवळ, ब्राम्हणेतर चळवळीचा वऱ्हाडातील वर्धा, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा परिसरात मोठाच दबदबा होता. वर्धा, अमरावती येथील सत्यशोध ची अधिवेशने, ब्राम्हणेतर पक्षाच्या परिषदा, शेतकरी परिषदा, शिक्षण परिषदा, महिला परिषद यामुळे ब्राम्हणेतर समाजाचे उत्तम प्रबोधन झाले. सत्यशोधक समाजाचे महाराष्ट्रातील ज्येष्ठ थोर नेतृत्व खासकरून विदर्भात येऊन पराकाष्ठा करत, परिणामतः विदर्भात सत्यशोधक चळवळीला जनाधार मिळत गेला. पंजाबराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तर वऱ्हाडातील शैक्षणिक कृषिविषयक प्रगतीच्या वाटा विकसित होत गेल्या. संत गाडगेबाबा, आडकोजी महाराज, तुकडोजी महाराज, गणपती महाराज आणि अठरापगड जातीतील त्यांचा मोठा अनुयायीवर्ग यांच्या माध्यमातून जनप्रबोधनाचा प्रवाह मोठाचमोठा होत गेला. जनमानसात रुढ लोककला आणि लोकसंगिताचा सत्यशोधक चळवळतील मुखंडांनी वेध घेऊन मोठ्या खुबीने त्याचा वापरही केला. जलसा हा प्रकार सत्यशोधकांनी आपलं बलस्थान बनवलं. महाराष्ट्रात नायगावकर यांचा सत्यशोधक जलसा प्रख्यात होता, तसाच विदर्भात हरीचा जलसा; सत्यशोधक ब्राम्हणेतर प्रबोधन चळवळीचे महत्त्वाचे अंग होते. तुकडोजी महाराजांनी खंजिरी आणि वाद्यासह कीर्तन, या माध्यमातून गुरूदेव सेवा मंडळाचे जाळेच विणून टाकले. सत्यशोधक–ब्राम्हणेतर, संतमंडळी आणि लोकसंगित लोककलेच्या निरंतर लढ्यातून समतावादी, मानवतावादी विचार विदर्भाच्या मातीत रुजत होता. पुरोगामी मानसिकता घडण्याची ही परंपरा अखंडपणे चालू राहिली.

वऱ्हाडची हीच सांस्कृतिक परंपरा सत्यपाल महाराज समृद्ध, संपन्न करत आले आहेत. गेली पाच–साडेपाच दशके सत्यपाल महाराज लोकांच्या हृदयात आतल्या कप्प्यात बसलेले आहेत. ओबीसी–भटकेविमुक्त–दलित–आदिवासी–अल्पसंख्यांक इ. सामाजिक संघटनांच्या कार्याची महती ध्यानात घेऊन सत्यपाल महाराज सामाजिक संघटनांशी सौहार्दाचे नाते जपतात. सुमारे पाच वर्षापूर्वी नागपूर येथे डॉ. आ. ह. साळुंखे सर यांचा अमृत महोत्सव आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून सत्यपाल महाराज आवर्जून उपस्थित होते. अमृत महोत्सवात कीर्तनकार नव्हे तर, वक्ता म्हणून उपस्थित होते. अर्थातच, त्यांच्या प्रबोधनाची दिशा यावरून ध्यानात आल्याशिवाय राहत नाही. दारुबंदी, व्यसनाधीनता, बालविवाह, सतीप्रथा, अंधश्रद्धा, बुवाबाजी, धर्मांधता, जातीभेद, लिंगभेद, शिक्षण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, गलथान राजकारण, भाऊबंदकी, ग्रामविकास, ग्रामगीता, सरकारी योजना आदींवर त्यांच्या कीर्तनाचा झोत असतो. तुकडोजी महाराजांच्या भजनांच्या संदर्भासह गायन आणि सप्तखंजरी वादन यातून लोकरंजन आणि प्रबोधन दोन्हीही प्रभावीपणे अलगद होते. लोकांच्या मनाचा ठाव घेणारे, लोकांच्या जीवनातील सुखदुखाशी तादात्म्य पावणारे सत्यपाल महाराजांच्या कीर्तनाला अलोट गर्दी असते. सुमारे पस्तीस वर्षांपूर्वीचा अनुभव सांगावासाच आहे.

आजनसरा या गावी सत्यपाल महाराजांचे कीर्तन होते. बहुधा भोजाजी महाराज पुण्यतिथीचे ते पर्व असावे. उन्हाळ्यातील दिवस होते. त्याकाळी आजच्या प्रमाणे दळणवळणाची साधने नव्हती. रस्तेही ओबडधोबड तरी कीर्तनाला लोकांची अफाट गर्दी. लोक सायकल, बैलगाडी, पायी असे अंधाऱ्या वाटेने, जमेल त्याप्रकारे कीर्तनाला जात. माणसंबाया, मुलीमुलं, म्हातारे–तरुण, नेटके–फाटके, सत्यपाल महाराजांचे चाहते. पंचक्रोशीतील लोक सत्यपालची सत्यवाणी ऐकण्यासाठी येत. लोकप्रियतेबाबत आजही तेच चित्र आहे. सत्यपाल महाराज आणि त्यांचे सहकारी अथकपणे हजारो मैलाचा प्रवास करुन लोक चेतना जागी करत आहेत. सत्यपाल महाराज आता एकटे नाहीत, त्यांच्यासारखेच, त्याच शैलीत कीर्तन करणारे, एकापेक्षा एक सरस. सत्यपाल महाराजांच्या नावातील मपालफ (पवनपाल,संदीपपाल,उदयपाल वगैरे)हा प्रत्यय आपल्या नाव–ाशी लावून सत्यपाल महाराजांचा प्रबोधनाचा घेतलेला वसा आणि वारसा चालवतात. संस्कार शिबिरातून बालकलाकार तयार करुन त्यांना कीर्तनाचे प्रशिक्षण देणे, कीर्तनकारांची नवपिढी घडवणे, हेही त्यांच्या कार्याचे महत्त्वाचे अंग आहे. सत्यपाल महाराजांचा सन्मान हा खऱ्या अर्थाने प्रबोधन चळवळीचा गौरव होय, कृतज्ञता होय.

**अनुज हुलके**
**नागपूर**




चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर येथे ओबीसी पदाधिकारी निवेदन देताना.



चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी येथे ओबीसी पदाधिकारी निवेदन देताना.



यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथे ओबीसी पदाधिकारी निवेदन देताना.



जालना जिल्ह्यातील परचूर येथे ओबीसी पदाधिकारी निवेदन देताना.



वर्धा येथे कराडे सर प्रतिष्ठानच्यावतीने ओबीसी वसतिगृहात संदर्भात निवेदन देण्यात आले.

# प्रेमविवाह करा; पण आई-वडिलांची परवानगी असेल तरच विवाहाची नोंद

**सालेकसा:** प्रेमविवाह करा; परंतु तुमच्या प्रेमविवाहाला आई–वडिलांची परवानगी असेल तरच ग्रामपंचायतमध्ये विवाह नोंदणी करण्यात येईल. असा ठराव तालुक्यातील नानव्हा ग्रामपंचायत ग्रामसभेत एकमताने घेतला.त्यामुळे आता प्रेमविवाह करायचा असेल तर आई–वडिलांची परवानगी घेणे गरजेचे आहे. त्याशिवाय ग्रामपंचायतच्या रजिस्टरवर त्यांची विवाह नोंदणी होणार नाही. असा ठराव घेणारी नानव्हा ग्रामपंचायत ही कदाचित राज्यातील पहिली ग्रामपंचायत असावी.

गावात यापुढे कुणाला प्रेमविवाह करायचा असेल तर नियोजित वधू–वराच्या आई–वडिलांचे परवानगी पत्र अनिवार्य केले आहे. दरम्यान, या ठरावानुसार आई–वडिलांचे परवानगीचे पत्र असेल तरच विवाहाची नोंद ग्रामपंचायतच्या दप्तरी करण्यात येईल. त्यांनाच विवाह केल्याचा दाखला मिळेल असा ठरावही ग्रामसभेत पारित करण्यात आला. या ठरावाची प्रत तहसीलदार, जिल्हाधिकारी यांना देण्यात येणार आहे.



या निर्णयाची महाराष्ट्रात अंमलबजावणी व्हावी यासाठी कायदा तयार करून आदर्श कुटुंब पद्धती अमलात यावी, यासाठी आता मुख्यमंर्त्यासह संबंधित विभागाचे मंत्री, अधिकारी यांनादेखील ग्रामपंचायतच्या माध्यमातून पत्रव्यवहार करण्यात येणार आहे, तसेच ग्रामपंचायत पारित केलेल्या ठरावाची प्रत पाठवून याची राज्यात सर्वत्र अंमलबजावणी करण्याची मागणी करणार असल्याचे सरपंच गौरीशंकर बिसेन यांनी सांगितले.

### विवाह नोंदणी प्रमाणपत्र हवेय? आधी वृक्ष लावा

**विवाह केलेल्या दाम्पत्याने विवाह दाखला मिळण्यासाठी आपल्या घरासमोर नवीन वृक्ष लागवड करून फोटो काढून ग्रामपंचायत कार्यालयात दाखविल्यानंतरच विवाह नोंदणीचा दाखला देण्याचा निर्णय ग्रामसभेत घेण्यात आला. सालेकसा तालुक्यातील नानव्हा ग्रामपंचायतीने पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी एक आगळावेगळा उपक्रम हाती घेतला आहे.**

### टोकाचे पाऊल उचलतात म्हणून ठराव

**प्रेमविवाहामुळे अनेक कुटुंब उद्धवस्त झाल्याच्या घटना घडल्या आहेत. सामाजिक मानहानी होत असल्याने आई–वडील टोकाचे पाऊल उचलतात. अशा घटनांना आळा बसावा याकरिताच प्रेम विवाहासाठी आई–वडिलांची परवानगी गरजेची असल्याचा ठराव ग्रामसभेने पारित केला आहे.**

**- गौरीशंकर बिसेन, सरपंच, ग्रामपंचायत नानव्हा**

# गुन्ह्यातून सोडण्यासाठी १ लाख मागणाऱ्या ठाणेदाराच्या रायटरला केले निलंबित

### त्याची विभागीय चौकशी सुरू

**पोलीस हवालदार बिजेंद्र धनलाल बिसेन (बक्कल नंबर १६०८) याला निलंबित केल्यानंतर त्याची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. चौकशीत काय निष्पन्न होते याकडे लक्ष लागले आहे.**

### रेकॉर्डींग असल्याची चर्चा

**या प्रकरणात पोलीस कर्मचाऱ्याने पैश्याची मागणी केलेली रेकॉर्डींग असल्याची चर्चा शहरात सुरू होती. त्या रेकॉर्डींगच्या आधारे त्याला निलंबित करण्यात आल्याचीही चर्चा होती.**

**गोंदिया:** ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या पिंडकेपार रोड दुर्गा ट्रेडर्स कबाडीच्या गोदामात २१ जुलैच्या दुपारी १२ वाजता आदर्श अनिल विश्वकर्मा २५ रा. गणेशनगर गोंदिया या तरुणाला मारहाण करुन त्याच्या जवळून १८ हजार रुपये रोख बळजबरीने हिसकावून घेतले.त्या तरूणाला धक्काबुक्की करून त्यांच्या कबाडी दुकानाला कुलूप लावून दोन्ही बाजूच्या भिंतीवर ही जमीन आपल्या मालकीची असल्याचे दाखविणाऱ्या १५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात आरोपी असलेल्या व्यक्तीला सोडण्यासाठी १ लाख रूपयाची मागणी गोंदिया ग्रामीण पोलीस ठाण्यातील ठाणेदाराचा रायटर बिजेंद्र धनलाल बिसेन (बक्कल नंबर १६०८) यांनी केली होती. या प्रकरणाची तक्रार पोलीस अधिक्षक निखील पिंगळे यांच्याकडे करण्यात आली होती.



या प्रकरणात त्या पोलीस कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आले आहे. या संदर्भात सविस्तर वृत्त असे की, अनिल गयाप्रसाद विश्वकर्मा (५३) रा. गणेशनगर गोंदिया यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दुर्गा ट्रेडर्स येथे कबाडीचे गोदाम त्यांनी तयार केले आहे. त्या जागेवर आरोपींनी आपला हक्क दाखवित असून तुम्ही आम्हाला २५ लाख रुपये द्या अन्यथा ती जागा आमची आहे आम्हाला परत करा असे बोलून आरोपी अरबाज उर्फ राजा अखिल शेख (३०), गणेश रामदयाल राऊत (२५), विनोद मेश्राम (३०) तिन्ही रा. गोंदिया व इतर १२ अशा १५ जणांनी त्यांना धमकाविले होते. २१ जुलै २०२३ रोजी आरोपीं त्यांच्या गोदामात गेले होते. त्यावेळेस आदर्श अनिल विश्वकर्मा (२५) हा तरुण गोदामात उपस्थित होता. गोदामातून त्याला धक्के मारुन बाहेर काढले. गोदामाला कुलूप लावले.

कबाडीचा व्यवसाय केल्यामुळे त्याच्या खिशात असलेले १८ हजार रुपये आरोपींनी घेतले. भिंतीवर ही जमीन आपल्या मालकीची आहे असे दाखवून तिथे आपल्या मोबाईल क्रमांक दर्शविला.

या घटने संदर्भात गोंदिया ग्रामीण पोलिसात १५ आरोपीविरुद्ध भादंविच्या कलम ३९५, ३२७, ३८५, ४५२, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक सचिन म्हैत्रे यांच्याकडे होता. त्यांचा रायटर बिजेंद्र धनलाल बिसेन (बक्कल नंबर १६०८) हा आरोपींसोबत काय बोलते हे माहित नव्हते. परंतु बिजेंद्र आपली पोळी शेकण्यासाठी आरोपींना गुन्ह्यातून सोडण्यासाठी त्यांच्याकडे १ लाख रुपयाची मागणी केल्याची चर्चा आहे. यासंदर्भात पोलिस अधिक्षकांकडे तक्रार करण्यात आल्याने या तक्रारीवरुन पोलिस अधिक्षक निखील पिंगळी यांनी त्या पोलीस कर्मचाऱ्याला निलंबित केले आहे.

# प्रायोगिक तत्तवावर वीस एकर शेतीमध्ये हळद व अद्रक लागवड-अदानी फाउंडेशनचा पुढाकार

**तिरोडा:–** अदानी फाउंडेशन तिरोडा द्वारा सेंद्रिय शेती बहुपीक लागवड कार्यक्रमांतर्गत तालुक्यातील २२ शेतकऱ्यांची निवड करून एकूण २० एकर शेतीमध्ये प्रायोगिक तत्त्वावर सेंद्रिय पद्धतीने हळद व अद्रक याची लागवड करण्यात आली.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश आपल्या परिसरातील शेतकरी फक्त भात पीक घेत आहेत. यामुळे शेतीची सुपीकता तसेच कस वाढण्यास अडथळा होत आहे. जर पीक बदलवित राहिले तर शेतीची सुपीकता वाढण्यास नक्कीच मदत होईल तसेच भात पिकाला पाहिजे तेवढा भाव मिळत नसल्याने शेतकऱ्याची आर्थिक उन्नती होत नाही. त्यामुळे पीक पॅटर्न बदलणे काळाची गरज आहे असे मत अदानी फाउंडेशन प्रमुख बीमुल पटेल यांनी व्यक्त केले.




या कार्यक्रमांतर्गत अदानी फाऊंडेशन तिरोडा मार्फत निवड केलेल्या बावीस शेतकऱ्यांना प्रति एकर रुपये तीस हजाराचे हळद व अद्रक बीज देण्यात आले. तसेच मार्गदर्शन सुद्धा करण्यात येत आहे.

सदर उपक्रम यशस्वी झाल्यास नक्कीच शेतकऱ्यांना याचा फायदा होईल व जास्तीत जास्त शेतकरी या पिकाकडे वळतील असे कार्यक्रमाधिकारी कैलास रेवतकर यांनी सांगितले.

### ट्रॅव्हल्सच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

**देवरी**–नागपूर–रायपूर महामार्गावरील देवरी येथे एका ७० वर्षीय वृद्धाला छत्तीसगडच्या भरधाव ट्रॅव्हल्सने जोरदार धडक दिली. यात वृद्धाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना देवरी तहसील कार्यालयासमोर घडली. मणीराम रामजू गोटे, रा. जेटभावडा, ता. देवरी, असे मृताचे नाव आहे.मणीराम गोटे कार्यालयीन कामाकरिता देवरी येथील तहसील कार्यालयात आले होते. दरम्यान, पैसे काढण्याकरिता बँकेत जाण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग ओलांडताना त्यांना रायपूरकडून देवरीकडे येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली.

# नातवाने केला आजोबाला ठार

**गोंदिया :** पत्नी व आईला घरात लपवून ठेवल्याच्या संशयातून नातवानेच आपल्या वृद्ध आजोबांना गळा दाबून ठार केले. डुग्गीपार पोलिस ठाण्यांतर्गत ग्राम गिरोला येथे शनिवारी (दि. २) रात्री ११:३० वाजेदरम्यान ही घटना घडली. या प्रकरणातील निष्ठूर नातवाला पोलिसांनी अटक केली आहे. यशवंत माधो कापगते (६७, रा. गिरोला) असे मृत आजोबाचे नाव आहे.

डुग्गीपार पोलिस ठाण्यांतर्गत ग्राम गिरोला येथील मृत यशवंत माधव कापगते (६७) यांना दोन मुले असून ते वेगवेगळे राहतात. यशवंत कापगते आपल्या धाकट्या मुलासोबत आरोपी रोशन अशोक कापगते (२६) यांच्या शेजारी राहतात. रोशन कापगते हा थोरल्या मुलाचा मुलगा (नातू) आहे. तो मागील अनेक दिवसांपासून दारू पिऊन घरातील मंडळींसोबत भांडण करुन मारहाण करीत होता.

शनिवारी (दि. २) त्याने घरी भांडण केल्यामुळे तो मारहाण करणार या भीतीने आई व पत्नी घरातून निघून गेले होते. रात्री ११ वाजेच्या सुमारास रोशन बाहेरुन आला असता, यावेळी यशवंत कापगते हे आपल्या घराच्या मुख्य दारावर बाथरुमकरिता जाण्यासाठी आले. यावेळी रोशनने त्यांच्या घराच्या मुख्य द्वाराजवळ येऊन पत्नी व आई कुठे गेली, असे विचारले. यासंदर्भात आपल्याला काहीच माहिती नाही, असे यशवंतने म्हटल्यावर रोशनने त्यांना शिवीगाळ केली. त्याच्या भीतीने यशवंत आत गेले व दार उघडले नाही म्हणून आरोपीने रागाच्या भरात दाराला लाथ मारुन आपला राग व्यक्त केला. तसेच थोड्या वेळाने परत शिवीगाळ करीत आज तुझा मर्डर करतो, शिक्षा भोगून घेईन असे म्हणत त्याने यशवंत यांचा गळा दाबून खून केला. या घटनेसंदर्भात रविवारी (दि. ३) दुपारी १ वाजता रेखा राधेश्याम झोडे (५०, रा. गिरोला) यांच्या तक्रारीवरुन डुग्गीपार पोलिसांनी भादंविच्या कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलिस निरीक्षक सिंगनजुडे करीत आहेत.

# पत्रकारांची लेखणी समाजाला दिशा देणारी :आ.विनोद अग्रवाल

**गोंदिया:** आजघडीला सोशल मीडियातून अनेक बातम्या व माहिती जलद गतीने प्राप्त होत असते मात्र त्यात विश्वसनीयतेचा अभाव असतो. अनेक आव्हानांना तोंड देत पत्रकारांनी विशेषतः प्रिंट मीडियाने आपली विश्वसनीयता व खरेपणा आज ही कायम ठेवलेला आहे. शासन, प्रशासन व समाजाला दिशा देण्याचे महत्वाचे कार्य पत्रकार आपल्या लेखणीतून सकारात्मक पद्धतीने निरंतर करीत आहेत, असे प्रतिपादन आ. विनोद अग्रवाल यांनी केले. प्रेस ट्रस्ट ऑफ गोंदियाचे अध्यक्ष अपूर्व मेठी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कायक्रमाला जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, माजी नगराध्यक्ष अशोक इंगळे, जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण सभापती पूजा अखिलेश सेठ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रकाश पाटील, सचिव रवी आर्य उपस्थित होते.

पुढे बोलताना अग्रवाल म्हणाले की प्रेस ट्रस्ट ऑफ गोंदिया चे कार्य स्तुत्य असुन समाजाला काही देणे आहे या भावनेतून चांगले कार्य करणाऱ्यांची निवड करुन त्यांना व समाजाला प्रोत्साहन देण्याचे कार्य ते सतत करीत आहेत. जिल्हयात पत्रकार भवन व्हावे यासाठी मी सदैव सोबत असून त्यासाठी प्रयत्नशील असल्याचे ते म्हणाले.

यावेळी प्रेस ट्रस्ट ऑफ गोंदियाच्या जीवन गौरव पुरस्काराने ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार लाटा यांना सन्मानित करण्यात आले. तर स्व.रणजितभाई जसानी स्मृति प्रित्यर्थ जिल्हा गौरव सामाजिक सेवा पुरस्कार पर्यावरण व प्राण्यांसाठी सेवाकार्य करणारे रघुनाथ भुते यांना, स्व. राम किशोर कटकवार स्मृति प्रित्यर्थ जिल्हा गौरव कर्तव्यनिष्ठ पुरस्कार समग्र शिक्षा अभियानाचे कार्यकारी अभियंता जिवनेश मिश्रा यांना,




स्व. रामदेव जायस्वाल स्मृति प्रित्यर्थ जिल्हा गौरव कला व साहित्यरत्न पुरस्कार योगिता दिनेश मौजे यांना, स्व.मोहनलाल चांडक स्मृति प्रित्यर्थ जिल्हा गौरव कृषीरत्न पुरस्कार त्रिवेणी गोविंद तुरकर यांना, सहयोग संस्थेतर्फे शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हा गौरव पुरस्कार शिक्षक मंगलमूर्ती सयाम यांना, स्व. प्रा. योगेश नासरे यांच्या स्मृतीत क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल जिल्हयातील प्रसिध्द धावक मुन्नालाल यादव यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, गौरव चिन्ह, प्रमाणपत्र व धनादेश हे पुरस्काराचे स्वरूप होते. विशेषत्वाने ८१ वर्षीय मुन्नालाल यादव यांना दुबई येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेकरीता अकरा हजाराचा धनादेश देण्यात आला. या वर्षीचा विशेष पुरस्कार समाजात निरंतर पर्यावरण संवर्धन व व्यायामासाठी जनजागृती करणाऱ्या सायकलिंग संडे गृप ला देऊन गौरव करण्यात आला.

हा पुरस्कार मंजू कटरे, रवि सपाटे व त्याच्या चमुने स्वीकारला. यावेळी कार्यक्रमात प्रामुख्याने अमर वऱ्हाळे, विजयजित वालिया, जयदीप जसानी, डॉ. माधुरी नासरे, रोशन जायस्वाल, डॉ. नीरज कटकवार, अशोक चांडक, डॉ. दिलीप संघी, छैलबिहारी अग्रवाल, सविता बेदरकर, भालचंद्र ठाकुर, डॉ गजानन डोंगरवार, रत्नदीप दहीवले, डॉ प्रशांत कटरे, जे के लोखंडे, भीकम शर्मा, के के गजभिये, सावन बहेकार, संजय जैन, दिपक कदम, धर्मिष्ठा सेंगर, अजय श्यामका आदि जिल्हयातील गणमान्य नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.संचालन जयंत शुक्ला यांनी केले. सत्कारमूर्ती चे परिचय वाचन राजन चौबे यांनी तर आभार नरेश रहीले यांनी मानले.यशस्वितेसाठी संतोष शर्मा, हिदायत शेख, अंकूश गुंडावार, जावेद खान, हरींद्र मेठी, कपिल केकत, प्रमोद नागनाथे, मुकेश शर्मा, भरत घासले, आशिष वर्मा, योगेश राऊत, दिपक जोशी, सौ.अर्चना गिरी, बिरला गणवीर, रवींद्र तुरकर, संजीव बापट आदिंनी परिश्रम घेतले.

# काँग्रेसच्या जनसंवाद यात्रेला हरदोली येथून सुरवात

**देवरी:** परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात संविधान कमेटीच्या माध्यमातून आपल्या देशाचे संविधान तयार करण्यात आले. तेच संविधान आता केंद्रसरकार बदलून टाकण्याची भाषा करीत आहे. या देशात आता लोकशाहीची जागा हिटलरशाहीने घेतली आहे. या हिटलरशाहीच्या माध्यमातून दडपशाहीचे राज्य येईल आणि त्यामुळे प्रत्येक नागरिकांच्या मूलभूत हक्क आणि अधिकाराचे हनन होईल. यामुळे यामाध्यमातून पुन्हा देशात पारतंर्त्य येऊ पाहत आहे. देशातील लोकशाही वाचविण्यासाठी काँग्रेसपक्षाने या जनसंवाद यात्रेची सुरवात केली असून प्रत्येक नागरिकाने या यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन देवरी–आमगाव विधानसभेचे आमदार सहसराम कोरोटे यांनी केले आहे.



देवरी तालुक्यातील हरदोली येथून या संवाद यात्रेची सुरवात रविवारी (दि.३) करण्यात आली त्यावेळी आमदार कोरोटे मार्गदर्शन करताना बोलत होते.

आमदार कोरोटे पुढे बोलताना म्हणाले की,काँग्रेस पक्षाने देशामध्ये एअरपोर्ट तयार केले. रेल्वेचे जाळे विणले. अनेक प्रकारचे दवाखाने, शाळा–कॉलेज तयार केले. ह्या देशाची व्यवस्था पद्धतशीरपणे सुरू राहिली पाहिजे, यासाठी म्हणून काँग्रेस सरकारने सर्व संस्था सुरू केला. पण त्यांना विकण्याचे काम ह्या केंद्र सरकारचा म्हणजे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे करीत आहे.

याउलच आमचे नेते राहुलजी गांधी ह्यांनी मागील काळामध्ये देशबचाव, भारतजोडो यात्रा३ केली. लोकांमध्ये आपापसात द्वेषभावनेऐवजी प्रेमभावना असली पाहिजे. ह्यासाठी म्हणून त्यांनी भारतजोडो यात्रा काढली. त्यासाठी त्यांनी ४ हजार ४०० किलोमीटर यात्रा संपूर्ण देशभर केली आहे.

यात्रेमध्ये अनेक लोक सामील झाले. राहुलजी गांधी भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून लोकांना जोडण्याचा काम केले आहे. असेही कोरोटे यावेळी म्हणाले. आपले हक्क आणि अधिकार अबाधित ठेवण्यासाठी या जनसंवाद यात्रेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घेवून याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री कोरोटे यांनी केले आहे.

## १२ सप्टेंबरला ऑनलाईन कार्यशाळा व पेंशन अदालत

**गोंदिया:** महालेखाकार कार्यालय नागपूर तसेच सहसंचालक लेखा व कोषागारे नागपूर, जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया व जिल्हा कोषागार कार्यालय गोंदिया यांच्या संयुक्त वतीने महालेखाकार नागपूर यांचेकडून नामंजूर निवृत्तीवेतन प्रकरणे/ आक्षेपीत झालेले निवृत्तीवेतन प्रकरणे निकाली काढण्यासाठी १२ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात ऑनलाईन कार्यशाळा तथा ऑनलाईन पेंशन अदालत आयोजित करण्यात आली आहे. यावेळी ज्या आहरण व संवितरण अधिकारी (ऊऊज) यांचेशी संबंधीत आहेत असे आहरण व संवितरण अधिकारी व संबंधीत निवृत्तीवेतन धारकांनी जसे– जिल्हाधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य विभाग, वन विभाग, पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभाग, तहसिल कार्यालये, समाज कल्याण व आदिवासी विकास विभाग, कृषि विभाग, भूमी अभिलेख व जलसंधारण विभागासाठी कार्यशाळेची वेळ सकाळी १०.१५ ते दुपारी १.३० पर्यंत आहे.

त्याचदिवशी दुय्यम निबंधक सहकारी संस्था व मुद्रांक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, नगर रचनाकार, माजी सैनिक कल्याण विभाग, पोलीस विभाग व इतर कार्यालयासाठी कार्यशाळेची वेळ दुपारी २.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे.

तरी जिल्ह्यातील निवृत्तीवेतन धारकांच्या सेवानिवृत्ती वेतनाबाबत ज्या काही अडीअडचणी असल्यास सदर प्रकरणाचे निराकरण करण्यासाठी १२ सप्टेंबर रोजी संबंधित विभागाला दिलेल्या नियोजित वेळेनुसार आवश्यक त्या कागदपत्रासह उपस्थित राहावे. असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी चं.रा.आंबोळे यांनी केले आहे.


## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, गोंदिया

**ई-निविदा सुचना क्र. २१**

**सन २०२३-२०२४ (व्दितीय मागणी)**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग कार्यालय गोंदिया, उपविभाग क्र. १,२,३ गोंदिया, साकोली, भंडारा येथे ग्रीष्म कालीन कालावधीकरिता कुलरची रिपरिंग, ओव्हरऑईलिंग व नवीव कुलरचा पुरवठा करण्याच्या कामाची निविदा मजीप्रा कडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित किंमत रू. १,१५,२९२/– आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दिनांक ०४/०९/२०२३ ते दि. १३/०९/२०२३ पर्यंत विभागीय कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग, गोंदिया**



## ग्रामपंचायत कार्यालय कमरगाव

**पंचायत समिती गोरेगाव जिल्हा परिषद, गोंदिया**

**निविदा सुचना**

ग्रामपंचायत कार्यालय कमरगाव पंचायत समिती गोरेगाव जिल्हा परिषद गोंदिया हे १५ वित्त आयोग निधी अंतर्गत सन २०२१–२२ व २०२२–२३ या वर्षाकरिता विविध बांधकामे व साहित्य खरेदी करण्याकरिता निविदा ग्रामपंचायत कमरगाव,पंचायत समिती गोरेगाव ,जि.प.गोदिंयाकडे यथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावारी ऑफलाईन पद्धतीने मागवित आहे. निविदेचा विस्तृत नमुना ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर दिनांक ०५/०९/२०२३ पासून उपलब्ध आहे.

| s.n. | 2022-2023 | | | |
|---|---|---|---|---|
| | Activity Code | Name of Activity | Sector | Estimated Cost |
| 1 | 59735163 | बंदिस्त नाली बांधकाम | Samitation | 150000 |
| 2 | 59735348 | अंगणवाडी क्र.३ च्या आवारात गट्टू बांधकाम करणे | Samitation | 150000 |
| 3 | 59735853 | अंगणवाडी क्र.१,२,३ ला रंगरगोटी करणे व इतर साहित्य खरेदी करणे | Samitation | 32835 |
| 4 | 53735853 | पाणी पुरवठा योजनेसाठी नळ जोडणी वाढविणे व विज बिल भरणे व साहित्य | Samitation | 150000 |
| 5 | 59736047 | दुहेरी हातपंप दुरुस्ती करणे व साहित्य खरेदी करणे/घनकचरा व सांडपाणी | Drinking water | 150000 |
| 6 | 59736529 | शासकीय इमारतीवरील पाणी संकलन करणे | Drinking water | 32835 |
| 7 | 59736914 | अपंगाना साहित्य पुरवठा करणे | Health | 20000 |
| 8 | 59737447 | माता चौक येथे बसण्यासाठी ओटा बांधकाम करणे | GP Office Infrastructure | 100000 |
| 9 | 59737982 | ग्रा.पं.देखभाल दुरुस्ती व ग्रा.पं.ला लॅपटॉप, इन्वेटर, उमेद च्या बचत गटासाठी साहित्य खरेदी करणे | Markets and fairs | 75000 |
| 10 | 59738565 | नविन हातपंप बसविणे | Sanitation | 69065 |
| 11 | 59739119 | जि.प.शाळा कमरगाव येथे लाईट बिल भरणार | Rural ectrification | 92090 |

| s.n. | 2021-2022 | | | |
|---|---|---|---|---|
| | Activity Code | Name of Activity | Sector | Estimated Cost |
| 1 | 50244800 | women and chiled development | anganwadi 3 Digitalchart and other materials | 100000 |
| 2 | 50170571 | Backward Class Development | Purchess of Materials Pipe line | 39840 |
| 3 | 50169752 | Health | Purchess of Medicine for Fawarani | 30000 |
| 4 | 50169349 | Education | ZP School Construction Bhojan set | 90000 |
| 5 | 50169032 | Education | Pinting of Anganwadi and toilet Construction | 50000 |
| 6 | 50168596 | Backward Class Development | Women Progrram | 54920 |
| 7 | 50168243 | Backward Class Development | Bandist Nali Construction | 179840 |
| 8 | 50167058 | Livlywood | Woment Development Progrram and Other | 90000 |
| 9 | 50166644 | Health | Bandist Nali Construction | 200000 |

**अरविंद के.सारवरे**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत पंचायत कमरगाव**

**सौ.भागवंती मदनलाल अटरे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पंचायत कमरगाव**

